विना सहकार नाही उद्धार !
पारिजात
को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.
नवी मुंबई

# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.

नोंदणी क्रं. : टी.एन.ए. (टी.एन.ए.) / आर.एस.आर./ सी.आर./९५१/९७




# ११ वा वार्षिक अहवाल

## सन २००७ - २००८

# विद्यमान संचालक मंडळ



श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष



श्री.दशरथ आ. बडदे
उपाध्यक्ष



श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव



श्री. कृष्णा पां. धुमाळ
खजिनदार



श्री. दिपक शं. टेळे
संचालक



श्री. श्रीपती शं. गरुड
संचालक



श्री. अमृत दा. पाटील
संचालक



श्री. आनंदा बा. आंबवले
संचालक



सौ. मंदा ज्ञा.खोपडे
संचालिका



श्री. अनंत ना. प्रभाळे
संचालक



श्री. शंकर रा. पुली
संचालक



श्री. सचिन य. रणनवरे
कर्मचारी प्रतिनिधी



श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्य. अधिकारी

# पारिजात को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

रजि. नं. टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस.आर./(सी.आर.) ९५१/९७
मुख्य कार्यालय : अे/३/७, सेक्टर-१५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३.

## अकरावी वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येते की, पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेची **अकरावी सर्वसाधारण सभा शनिवार दि. ०९ /८/२००८ रोजी दुपारी ४.०० वाजता गुरव ज्ञाती भवन,२-सी/३,सेक्टर ९-ए, बस डेपोजवळ, वाशी, नवी मुंबई,** या ठिकाणी संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास विठ्ठल खोपडे यांच्या अध्यक्षतेखाली नमूद केलेल्या विषयाचा विचार विनिमय करण्यासाठी आयोजीत केली आहे. तरी सर्व सन्माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित राहून कामकाजात भाग घ्यावा ही विनंती.

## सभेपुढील विषय

१) दि. १२ /०८ /२००७ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि. ३१ मार्च २००८ अखेरचा कार्यकारी मंडळाने सादर केलेले ताळेबंद पत्रक व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.
३) मा. संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २००७-२००८ नफा विभागणीस मंजुरी देणे.
४) सन २००६-२००७ च्या वैधानीक लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.
५) सन २००७-२००८ च्या अंतर्गत लेखापरिक्षण अहवालास मंजुरी देणे.
६) सन २००८-२००९ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासणीसाची नेमणूक करुन मानधन ठरविणे.
७) सन २००८-२००९ च्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे.
८) पोटनियम दुरुस्तीस मान्यता देणे
९) संचालक मंडळाच्या नवनिर्वाचीत सदस्यांची यादी जाहिर करणे.
१०) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

संचालक मंडळाच्या वतीने

ठिकाण : नवी मुंबई.
दिनांक : २५/७/२००८

श्री. बाळासाहेब विश्वास ताकवले
(सचिव)

## विशेष सूचना

१) गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास, ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने त्याच ठिकाणी ही सभा घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना करावयाच्या असतील त्यांनी नियोजीत सभेच्या तारखेपूर्वी सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी कळविणे आवश्यक आहे.
३) सभेस येताना अहवालाची प्रत बरोबर आणावी.



# जो जे वांछील तो ते लाहो !.....

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आपल्या संस्थेच्या ११ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने आपणा सर्वांचे मन:पुर्वक स्वागत ! गत १० वर्षातील वाटचालीकडे वळून पाहताना संस्थेने केलेल्या भरीव प्रगती बाबत मन अभिमानाने भरुन येते. या कालावधीत संस्थेच्या नऊ शाखा व जवळपास ५००० चौ. फु. क्षेत्रफळ असलेले स्वमालकीचे सुसज्ज प्रशासकीय कार्यालय असा विस्तार झाला आहे. संस्थेच्या एकूण संमिश्र व्यवसायाने रु. ३४.०० कोटींचा टप्पा पूर्ण केला आहे.

आज पारिजात परिवारात आपल्या सेवेसाठी सुमारे १५० कर्मचारी व दैनंदिन ठेव प्रतिनिधी कार्यरत असून या सर्वांच्या माध्यमातून पारिजातच्या सर्व सुविधा आपणांस दिल्या जात आहेत, आज बँकीग उद्योगाला विविध आव्हानांचा सामना करावा लागत आहे. बँकावर अनेक निर्बंध लागू केले जात असून ठराविक काळाने हे सर्व निर्बंध पतसंस्थांना सुध्दा लागू केले जात आहेत यामध्ये उत्तम प्रकारे बॅकींग करणाऱ्या सक्षम पतसंस्थाच टिकणार आहेत.

आज पतसंस्थांची कार्यपध्दती बदलली आहे. पतसंस्थांनी कामकाजामध्ये अधिक व्यावसायीकता आणने, सरकारी नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक बनले आहे. यामध्ये यशस्वी होण्यासाठी केवळ संगणकीकरण करुन संस्था आधुनिक व सक्षम होणार नाहीत. त्यासाठी आपण सर्वांना आपल्या विचारांच्या कक्षा अधिक रुंद करणे, दूरदृष्टी ठेवणे व स्वयंशिस्त अंगी बाणविने गरजेचे आहे, परंतू ही प्रक्रिया एकतर्फी असून चालणार नाही. बँक किंवा संस्थेची कार्यपध्दती बदलली की ग्राहक सभासदाने सुध्दा असे बदल स्विकारणे आवश्यक आहे.

आज प्रत्येक संस्थेने सभासदांच्या माहिती साठी कामकाजा मध्ये अधिक पारदर्शकता आणली पाहिजे. संस्थेच्या ज्या मुख्य समस्या असतात ते थकबाकीचे प्रमाण, एन.पी.ए.चे प्रमाण, त्याच्या तरतूदी याची माहिती सभासदांना होणे आवश्यक आहे. परंतू अनेक संस्था या बाबींचा उल्लेख अहवालात करणे टाळतात. याबाबत सभासदांमध्ये जागरुकता येणे आवश्यक आहे.

असो, सभासद बंधुंनो येत्या दोन वर्षात संस्थेच्या ठेवीचा टप्पा रु. पन्नास कोटींच्या पुढे न्यावयाचा आहे. त्यादृष्टीने मी व माझे सहकारी प्रयत्नशील असून याकामी मला आपणा सर्वाचे सहकार्य अपेक्षीत आहे. पारिजातची प्रगती करताना आपणा सर्वांना मदत करणे, आपल्या सर्वांच्या आर्थिक गरजा पुर्ण करणे यालाच आम्ही शंभर टक्के प्राधान्य देणार आहोत.थोडक्यात "जो जे वांछील तो ते लाहो" हीच आमची धारणा असेल, हेच आमचे कर्तव्य असेल, हा विश्वास बाळगा!

**धन्यवाद !**

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी
कैलास खोपडे
(अध्यक्ष)

# ११वा वार्षिक कार्य अहवाल सन २००७ - २००८

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

संस्थेच्या संचालक मंडळाच्या वतीने दिनांक ३१ मार्च २००८ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा ११ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद पत्रक व नफा -तोटा पत्रक आपणासमोर सादर करताना आम्हास कर्तव्यपूर्तीचा विशेष आनंद होत आहे.दरवर्षीप्रमाणे या वर्षीसुद्धा संस्थेने आपल्या प्रगतीची वाटचाल ठरवून दिलेल्या उद्दिष्टानुसार चालू ठेवलेली आहे.

अहवाल वर्षात संस्थेने केलेल्या प्रगतीची व कामकाजाची कल्पना पुढील आकडेवारीवरुन येईल.

## संस्थेची वित्तीय स्थिती :-

(रु.लाखात)

| तपशिल | ३१/३/२००७ रु. | ३१/३/२००८ रु. | वाढ रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ९५.३६ | १०६.८५ | ११.४९ | १२.०४ |
| राखीव व इ.निधी | ८९.८० | ११०.७९ | २०.९९ | २३.३७ |
| सभासद ठेवी | १५०७.८९ | १८६०.३५ | ३५२.४६ | २३.३७ |
| गुंतवणूक | ३३२.५२ | ३७७.०२ | ४४.५० | १३.३८ |
| सभासद कर्जे | ११८२.०० | १५१२.६२ | ३३०.६२ | २७.९७ |
| खेळते भांडवल | १७३२.६७ | २११७.५३ | ३८४.८६ | २२.२१ |

पारिजात संस्थेने सहकारी तत्वाचा पुर्ण सन्मान राखून आपल्या आर्थिक व सामाजिक सेवेने आम जनतेमध्ये विश्वासाची, सहकाराची, विकासाची भावना निर्माण केली आहे. सभासद ठेवीदार व हितचिंतक यांच्या सहाय्याने व निस्वार्थीपणे केलेल्या अव्याहत परिश्रमामुळे संस्थेने आपल्या प्रगतीची उद्दिष्टे व आर्थिक धोरणे जोपासली असून केलेली प्रगती नेत्रदिपक आहे. याबद्दल आपले दुमत होणार नाही याची आम्हाला खात्री आहे.

## संस्थेच्या प्रगतीचा विस्तृत आढावा

### सभासद : ४९०१

गतवर्षी संस्थेचे ४५९५ सभासद होते, अहवाल वर्षात ५१७ नवीन सभासद झाले आणि २११ सभासदांनी राजीनामा दिल्यामुळे अहवाल वर्षाअखेर ४९०१ सभासद संख्या झाली आहे.

### भाग भांडवल : रु. १०६.८५ लाख

संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये पाच कोटी असुन गतवर्षाअखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. ९५,३५,७००/- इतके होते. त्यामध्ये अहवाल वर्षात रु. ११,४९,३००/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००८ अखेर संस्थेचे वसुल भागभांडवल रु. १,०६,८५,०००/- इतके आहे.

## गंगाजळी व इतर निधी : रु. ११०.७९ लाख

संस्थेची जनमानसात असलेली विश्वासार्हता ही संस्थेच्या स्वनिधीवर अवलंबून असते. निधी जेवढा जास्त तितका संस्थेचा पायाही मजबूत असतो, यानुसार संस्थेने राखीव निधी, इमारत निधी, संशयित व बुडीत कर्ज निधी, थकित व्याज निधी, लाभांश समीकरण निधी, सभासद कल्याण निधी, धर्मादाय निधी, सेवक कल्याण व प्रशिक्षण निधी, आकस्मिक निधी तसेच सेवक ग्रॅज्युईटी निधी उभारलेले आहेत.

गतवर्षाचे संस्थेचे एकूण स्वनिधी रु. ८९,७९,९९२/- होते त्या मध्ये अहवाल साली रु. २०,९८,८१०/- ने वाढ होऊन वर्षाअखेरीस एकूण स्वनिधी रुपये १,१०,७८,८०२/- इतका झाला आहे.

## ठेवी : रु. १८६०.३५ लाख

संस्थेच्या ठेवी संकलनामध्ये अहवाल वर्षात नेत्रदीपक वाढ झाली आहे. संस्था देत असलेली ग्राहक सेवा तसेच आपणा सर्वांचा दृढ विश्वास यामुळेच हे साध्य होऊ शकले.

गतवर्षाअखेर ठेवी रु.१५,०७,८९,४७९/- होत्या. त्यामध्ये रु. ३,५२,४५,४८४/- ने वाढ होऊन दि. ३१ मार्च २००८ अखेर संस्थेच्या एकूण ठेवी रु.१८,६०,३४,९६३/-झाल्या असून ठेवी वाढीचे प्रमाण २३.३७% इतके आहे.

संस्थेने ठेवीदारांकरिता विविध आकर्षक ठेव योजना बनविल्या असून प्रत्येक सभासदांनी ठेव योजनेत पैसे गुंतवून लाभ घ्यावा. संस्थेच्या विविध योजनांमध्ये अहवाल वर्षाअखेर खालीलप्रमाणे ठेवी जमा झालेल्या आहेत व त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| ठेवीचा प्रकार | सन २००४-०५ | सन २००५-०६ | सन २००६-०७ | सन २००७-०८ |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | ९३,०८,३३३ | १,०५,७२,२०७ | १,४९,३४,३७४ | १,९५,३०,०७४ |
| दैनंदिन बचत ठेव | १,३७,७३,९४६ | २,०९,६८,३०८ | २,९३,१५,८३५ | ४,३०,६९,७६५ |
| अल्प मुदत ठेव | ७०,१६,२९१ | ९१,९१,४०८ | १,९४,६७,८०० | १,७६,४८,३६३ |
| मुदत ठेव | ९७,८१,३१९ | १,३२,१२,६६० | १,९२,७५,१४६ | २,३०,६५,८७१ |
| दामदुप्पट ठेव | १,७३,६१,४२३ | १,८२,८१,४२९ | १,८५,५१,५६७ | १,६५,४३,८९६ |
| पारिजात बक्षीस ९८ | ६,६३,७७४ | १,५०,६७६ | ७५,५३५ | ५७,५१५ |
| पारिजात बक्षीस २००० | ३८,७८,५७४ | ३६,७७,३६४ | ३,१६,००३ | २,१२,००३ |
| संकल्प सिद्धी ठेव | ४०,३२,४०० | ३१,५७,९९६ | ३०,२८,३३४ | २८,२३,४१० |
| सिद्धी ठेव | २९,१४,९१८ | २९,६०,०६१ | ३१,१४,६८२ | १,१६,००० |
| मासिक प्राप्ती ठेव | ५९,५४,६७५ | ९९,०२,७२५ | १,५६,६४,२७५ | १,५९,२०,९५० |
| आर्वत ठेव | १९,८४,७६२ | १८,८५,२३४ | २२,२८,३९५ | १३,६६,८१८ |
| सभासद ठेव | ४५,२१,४७१ | ४१,९०,१०८ | ३२,८२,७२३ | २९,५०,५७२ |
| शुभकार्य ठेव | ६३,७५,७४२ | १,२०,८८,१९३ | २,१५,३४,८१० | २,७२,७३,८१६ |
| धनवृद्धी ठेव | - | - | - | १,५४,५५,९१० |
| एकूण रु. | ८,७५,६७,६२८ | ११,०२,३८,३६९ | १५,०७,८९,४७९ | १८,६०,३४,९६३ |

## गुंतवणूक : रु. ३७७.०२ लाख

महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्याने निधीच्या गुंतवणूकीबाबत घालून दिलेल्या सर्व नियमांचे योग्य प्रकारे पालन केलेले आहे. गतवर्षी संस्थेची गुंतवणूक रु. ३,३२,५१,८५०/- एवढी होती. अहवाल वर्षात त्यात रु.४४,५०,१७८/-ने वाढ होऊन एकूण गुंतवणूक रु.३,७७,०२,०२८ /-एवढी आहे. या वाढीचे शेकडा प्रमाण १३.३८% एवढे आहे. (रु.लाखात)

| गुंतवणूक तपशील | रक्कम |
|---|---|
| दि. ठाणे जिल्हा. मध्य. सह. बँक लि. भाग | १,०००.०० |
| महा. राज्य. सह. पत. फेड.लि. भाग | ३,०००.०० |
| राखीव निधी (रिझर्व फंड) | ३३,३१,५३०.०० |
| संशयित व बुडित कर्ज निधी | १०,३५,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | १,७५,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | ५६,०००.०० |
| सेवक ग्रज्युईटी व कल्याण निधी | १,४९,०००.०० |
| धर्मादाय निधी | ५९,०००.०० |
| मुदत ठेव गुंतवणूक | ३,२८,९२,४९८.०० |
| एकूण रु. | ३,७७,०२,०२८.०० |

## कर्जे : रु. १५१२.६२ लाख

सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचनांनुसार छोट्या व मोठ्या व्यावसायिक, व्यापारी व नोकरदार सभासदांच्या आर्थिक उन्नतीसाठी व त्यांच्या जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी आपली संस्था सदैव कटिबद्ध आहे. म्हणूनच व कर्ज वाटपाच्यावेळी सर्वसामान्य सभासदांना आम्ही नेहमी अग्रक्रम दिलेला आहे व त्यांना प्राधान्याने कर्ज पुरवठा करुन सभासदांचे राहणीमान उंचविण्याचा प्रयत्न केलेला आहे. कर्जदारांनी कर्जाची नियमित परतफेड करावी अशी संस्थेची अपेक्षा असते.

गतवर्षाअखेर संस्थेचे रु.११,८२,००,२८१ /-कर्ज येणे बाकी होते अहवाल सालामध्ये संस्थेने सभासदांना रु.१३,१४,६०,४४०/-नव्याने कर्ज वाटप केले असून रु.९,८३,९८,५९२ /- कर्ज वसुल झालेले आहे. अहवाल वर्षाअखेरीस एकूण रु. १५,१२,६२,१२९/- कर्ज येणे बाकी आहे.

## कर्ज थकबाकी : प्रमाण ४.१९%

मा. सहकार आयुक्तांनी सन २००६-०७ पासुन ''अनुत्पादीत कर्जाचे''(N.P.A.) निकष पतसंस्थासाठी लागू केले आहेत. परिणामी संस्थेने आपली स्वतंत्र कर्ज वसुली यंत्रणा अधिक कार्यक्षम केली आहे. अनुत्पादीत कर्जे मर्यादित ठेवण्यासाठी आपल्या संस्थेने आटोकट प्रयत्न केले आहेत.

मार्च २००८ अखेर येणे कर्जाशी थकीत कर्जाचे शेकडा प्रमाण ४.१९% आहे. गतवर्षीच्या तुलनेत कर्ज थकबाकीचे शेकडा प्रमाण ०.७१% ने कमी झाले आहे.

## अनुत्पादक मालमत्ता (N.P.A.) व तरतूदी

बँकीग व्यवसायात कर्जास मालमत्ता असेही संबोधले जाते. या मालमत्तेपासून (कर्जापासून) संस्थेस उत्पन्नमिळाल्यास अशा मालमत्तेस 'अनुत्पादक मालमत्ता ' (Non Performing Asset) असे म्हणतात व त्याची वेगळी वर्गवारी करावी लागते. ज्याप्रमाणे रिझर्व्ह बँकेने सर्व बँकाना एन.पी.ए. ची वर्गवारी करण्याचे बंधन घातले. त्याचप्रमाणे मा. सहकार आयुक्त व निबंधक, महाराष्ट्र यांचे आदेशानुसार दि. ३१ मार्च २००६ पासून पतसंस्थाना सुद्धा एन.पी.ए.निकष लागू केले व अनुत्पादक कर्जाची कालावधीनुसार तरतूद संस्थेच्या नफ्यातून करण्याचे बंधन घातले आहे.

आपल्या संस्थेचे दि. ३१ मार्च २००८ अखेर निव्वळ एन.पी.ए. चे प्रमाण ४.२६ % आहे. मा. सहकार आयुक्तांच्या परिपत्रकानुसार निव्वळ एनपीचे प्रमाण हे १५ % पेक्षा कमी असणे आवश्यक आहे. सदर अनुत्पादीत कर्जाची संस्थेने १००% पेक्षा अधिक म्हणजे (१३०%) तरतूद केलेली आहे. दि. ३१ मार्च २००८ अखेर अनुत्पादीत कर्जाची तरतूद खालील प्रमाणे आहे.

(रु.लाखात)

| अ.क्र. | कर्जाचे वर्गीकरण | येणे कर्ज रक्कम | आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|
| १. | उत्पादित जिंदगी | १४३३.८८ | -- |
| २. | अनुत्पादित जिंदगी | | |
| | अ) सर्वसाधारण जिंदगी | ५५.९० | २.८० |
| | ब) संशयीत जिदंगी | २२.८४ | ८.६६ |
| | क) बुडीत जिंदगी | - | -- |
| | एकूण | १५१२.६२ | ११.४६ |

एन.पी.ए. साठी आवश्यक तरतुद रु. ११.४६ लाख असताना संस्थेने स्वेच्छेने रु. ३.४३ लाख ची आधिक तरतुद करुन प्रत्यक्ष तरतूद रु. १४.८९ लाख इतकी केली असून संस्थेची स्थीती अधिकाधिक भक्कम केली आहे हे आपणास कळविण्यास आनंद वाटतो.

## खेळते भांडवल : रु. २११७.५३ लाख

गतवर्षाअखेर संस्थेचे खेळते भांडवल रु. १७३२.६७ लाख एवढे होते. अहवालवर्षी संस्थेने सर्व क्षेत्रात भरीव कामगिरी केल्यामुळे खेळते भांडवल २२.२१ % प्रमाणे रु. ३८४.८६ लाखाने वाढून रु. २११७.५३ लाख इतके झाले.

## संचालक मंडळ सभा :

संस्थेचा कारभार गतीमान होण्यासाठी अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या एकूण सभा १३ झालेल्या आहेत तसेच कर्ज मंजुरी समितीच्या महिन्यातून दोन या प्रमाणे अहवाल वर्षात एकूण २४ सभा झालेल्या आहेत. त्याचबरोबर कामकाज नियंत्रण, कर्जवसुली यासाठी सुद्धा सभा आवश्यकते नुसार वेळोवेळी घेतल्या गेल्या.

## कर्मचारी व संचालक प्रशिक्षण :

अहवाल वर्षात संस्थेने आपल्या कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र शासनाच्या ''यशदा'' या प्रशिक्षण संस्थेत तसेच पुणे जिल्हा नागरी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., व महाराष्ट्र राज्य सहकारी संघ यांच्या मार्फत चालविण्यात येणाऱ्या प्रशिक्षण वर्गात सहभागी होण्यासाठी अधिकारी वर्गातील पाच व लिपीक वर्गातील आठ कर्मचाऱ्यांना टप्या टप्याने पाठविले. महाराष्ट्र शासनाच्या सहकार खात्यातर्फे घेण्यात आलेल्या जी.डी. सी. ॲन्ड ए परिक्षेमध्ये संस्थेच्या आठ कर्मचाऱ्यांनी पदविका प्राप्त केली आहे.

## नफा विभागणी : रु. १२.२० लाख

अहवालसाली एकूण खर्च व नियमानुसार करावया लागणाऱ्या तरतुदी वजा जाता रु. १२,१९,२८६.८१ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा रु. ४०६.११/- मिळून नफा रु. १२,१९,६९२.९२ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारास संचालक मंडळ करीत आहे. त्यास आपण मंजुरी द्यावी. ही नम्र विनंती.

(रु.लाखात)

| तपशील | | रक्कम रुपये |
|---|---|---|
| राखीव निधी (२५% प्रमाणे) | रु. | ३,०४,९५५.०० |
| लाभांश (५% प्रमाणे) | रु. | ४,७६,७९०.०० |
| इमारत निधी | रु. | १,५०,०००.०० |
| बुडित कर्ज निधी | रु. | १,६१,०००.०० |
| थकीत व्याज तरतूद | रु. | ५०,०००.०० |
| लाभांश समानिकरण निधी | रु. | १०,०००.०० |
| सभासद कल्याण निधी | रु. | १०,०००.०० |
| आकस्मिक निधी | रु. | ५६,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक नफा | रु. | ९४७.९२ |
| एकूण | रु. | १२,१९,६९२.९२ |

## लेखापरिक्षण :

संस्थेचे सन २००७-०८ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी बी. आर. सावंत अँड कं., चार्टर्ड अकौटंट यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.

## उल्लेखनीय बाबी :

संस्थेने अहवाल वर्षात जे उल्लेखनीय उपक्रम राबविले त्याचा तसेच अन्य बाबींचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे :-

### १) न्यु पनवेल शाखा उद्घाटन सोहळा :

संस्थेच्या ८ व्या न्यू पनवेल शाखेचे उद्घाटन दि. २९ जुलै २००७ रोजी गुरुपोर्णिमेच्या पवित्र दिनी मा.श्री. रामशेठ ठाकुर (मा. खासदार) यांच्या शुभहस्ते व मा.श्री. प्रशांतदादा ठाकुर (नगराध्यक्ष, पनवेल) यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले. या प्रसंगी मा. श्री. गणेश पाटील (नियोजन व विकास सभापती), मा.श्री. सुनिल नाईक (नगरसेवक), मा.सौ. सिताताई पाटील (नगरसेविका), मा.श्री. भास्कर शेट्टी (अध्यक्ष, व्यापारी असोसिएशन), तसेच खांदाकॉलनी व्यापारी असोसिएशनचे पदाधिकारी, श्री. दत्तु म्हत्रे, श्री. दत्तात्रय साळुंखे, श्री. दत्ताराम कंक, व अन्य मान्यवर आवर्जुन उपस्थित होते. या प्रसंगी उद्घाटन प्रित्यर्थ सर्व प्रथम ठेव ठेवणारे सन्माननीय ठेवीदार श्री. रामचंद्र खाशाबा जाधव, श्री. संजय विठ्ठल रणनवरे, श्री. संतोष पवार, कु. रेश्मा सदाशिव पाचांगणे यांचा या प्रसंगी मा. श्री. रामशेठ ठाकुर यांचे शुभहस्ते यथोचीत सत्कार करण्यात आला.

### २) चंदननगर शाखा उद्घाटन सोहळा :

संस्थेची ९ वी व पुण्यातील ४ थ्या चंदननगर शाखेचा उद्घाटन सोहळा कृष्णजन्माष्टमीच्या दिवशी दि. ३ सप्टेंबर २००७ रोजी मा.सौ. राजलक्ष्मी भोसले (महापौर, पुणे महानगरपालिका) यांचे शुभहस्ते व मा. श्री. बापूसाहेब पठारे(स्थायी समिती अध्यक्ष, पुणे म.न.पा.), मा.श्री. भिमराव गलांडे, मा.श्री. अशोकशेठ गावडे(संचालक, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समिती), मा.सौ. सुमनताई पठारे (नगरसेविका), मा.सौ. उषाताई कळंबकर (नगरसेविका), मा. श्री. दिनकर खरात (नगरसेवक), मा.श्री. ज्ञानेश्वर शिंदे (नगरसेवक), मा.श्री. प्रकाश गलांडे (नगरसेवक), मा. श्री. सचिन भगत (नगरसेवक), यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रसंगी श्री. हनुमंत तुपे, श्री. अजितराव बेंद्रे, श्री. हनुमंत काळे, श्री. संपतराव कोकडे, श्री. संदिप गलांडे यांचा सत्कार करण्यात आला.

### ३) वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर एजन्सी (Western Union) :-

जगातील २०८ देशात राहणाऱ्या भारतीयांकडुन देशात पाठविण्यात येणाऱ्या पैशाचे विनियम केंद्र पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी मध्ये करण्यात येत आहे. वेस्टर्न युनियन (Western Union) तर्फे नवी मुंबईतील पतसंस्थामध्ये अशी सुविधा उपलब्ध होण्याचा मान सर्वप्रथम "पारिजात" संस्थेने मिळविला आहे.

### ४) रुग्णांना फळ वाटप कार्यक्रम :

संस्थेच्या कोपरखैरणे शाखेच्या प्रथम वर्धापनदिनाचे औचित्य साधुन दि. १० डिसेंबर २००७ रोजी माथाडी हॉस्पिटल, कोपरखैरणे या रुग्णालयातील रुग्णांना संस्थेच्या वतीने अध्यक्ष श्री. कैलास खोपडे व अन्य संचालकांच्या हस्ते फळ वाटप करुन त्यांना उत्तम आरोग्य लाभावे अशा शुभेच्छा देण्यात आल्या. याप्रसंगी माथाडी हॉस्पीटलचे प्रमुख कार्यवाह डॉ. श्री. हणमंत पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

### ५) महिला दिन व जेष्ठ नागरीक दिन :

दि. ८ मार्च २००८ रोजी 'जागतीक महिला दिनाचे' औचित्य साधुन संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला. या प्रसंगी संस्थेच्या महिला कर्मचारी, महिला ठेव प्रतिनिधी तसेच महिला खातेदारांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले. त्याच प्रमाणे दि. १ ऑक्टोबर २००७ रोजी 'जेष्ठ नागरिक दिन' विभागीय स्तरावर साजरा करण्यात येऊन संस्थेच्या जेष्ठ खातेदार सभासद यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## आभार :

सहकार क्षेत्रास उत्तम वळण लागावे, सहकार चळवळ बळवट व्हावी यासाठी प्रयत्नशील असलेले महाराष्ट्र राज्याचे मा. सहकार आयुक्त व विशेष निबंधक सहकारी संस्था महाराष्ट्र राज्य, पुणे, मा. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोकण विभाग मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था पुणे, मा. उपनिबंधक सहकारी संस्था, ठाणे तालुका, ठाणे तसेच संस्थाकार्यक्षेत्रातील सहकारी खात्याचे विविध पदाधिकारी त्यांचेही संस्था ऋणी आहे.

संस्थेच्या कार्यक्षेत्रातील ठाणे जिल्हा सहकारी बोर्ड कल्याण, महाराष्ट्र राज्य सह.बँक, ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक तुर्भे, नवी मुंबई को-ऑप.बँक , कॉसमॉस को-ऑप.बँक, नॅशनल को-ऑप.बँक, अभ्युदय को-ऑप.बँक, महानगर सह.बँक , राजर्षी शाहु सहकारी बँक, ॲक्सिस बँक, सोपानकाका ना. सह.बँक, दि.सातारा सहकारी बँक, यांचे शाखाधिकारी व कर्मचारी यांची संस्था आभारी आहे.

संस्थेचे २००६-२००७ या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरिक्षक मे. मोर्झारीया अँड असोसिएटस, अंतर्गत लेखापरिक्षक श्री.बी.आर.सावंत,श्री.आर.आर.पिंगळे, संगणकासाठी मे. कॉमविझार्ड सिस्टमस, तसेच संस्थेचे कायदेविषयक सल्लागार यांनी संस्थेला आस्थेने मार्गदर्शन केल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या प्रगतीसाठी अहोरात्र झटणारे संस्थेचे कर्मचारी, दै.ठेव प्रतिनिधी, सभासद व ठेवीदार आणि हितचिंतकांनी दिलेले सहकार्य व प्रोत्साहन यामुळेच संचालक मंडळ यशस्वी वाटचाल करू शकले त्याबद्दल आपणा सर्वांचे पुन्हा मन:पुर्वक आभार मानुन आपल्या लोभाची व सहकार्याची वृद्धी व्हावी अशी प्रार्थना करतो.

## श्रद्धांजली :

अहवाल सालामध्ये थोर संत श्री गगनगिरी महाराज, भारतरत्न बाबा आमटे, थोर साहीत्यीक य.दि.फडके, विजय तेंडुलकर, नाट्यकलावंत मच्छिंद्र कांबळी, अभिनेते गणपत पाटील, चंद्रकांत गोखले, सुप्रसिद्ध पैलवान युवराज पाटील तसेच भारतातील अन्य ज्ञात-अज्ञात थोर नेते, संशोधक,शास्त्रज्ञ,तंत्रज्ञ, साहित्यिक, पत्रकार,सैनिक,कलावंत शिक्षण तज्ञ,सामाजिक कार्यकर्ते, सहकार तज्ञ आपल्या संस्थेचे मान्यवर सभासद, ठेवीदार व हितचिंतक दिवंगत झालेले आहेत त्यांना ही सभा नम्रतापुर्वक अभिवादन करुन त्या सर्वांच्या पवित्र स्मृतीस भावपुर्ण श्रद्धांजली अर्पण करीत आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

आपला सहकारी
श्री. कैलास खोपडे
(अध्यक्ष)

दि. ३१ मार्च २००८

| सन २००६-०७ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २००७-०८ रु. पैसे |
|---|---|---|---|
| ५,००,००,०००.०० | **अधिकृत भाग भांडवल :** | | ५,००,००,०००.०० |
| ९५,३५,७००.०० | **वसूल भाग भांडवल :** | | १,०६,८५,०००.०० |
| | राखीव निधी व इतर निधी | | |
| २८,१०,६७२.०० | राखीव निधी | ३२,९४,७८३.०० | |
| ४८,२३,२२६.०० | इमारत निधी | ५८,०७,९११.०० | |
| ९,१३,०००.०० | संशयित बुडीत कर्ज निधी | १४,८९,०००.०० | |
| १,६५,०००.०० | लाभांश समानिकरण निधी | १,७५,०००.०० | |
| ४५,१५२.०० | सभासद कल्याण निधी | ५५,१५२.०० | |
| ५३,९९९.०० | धर्मादाय निधी | ५३,९९९.०० | |
| ४३,०००.०० | सेवक कल्याण निधी | ४३,०००.०० | |
| २६,२१८.०० | सहकार प्रशिक्षण निधी | २०,२३२.०० | |
| ६८,७२५.०० | सेवक ग्रॅज्युईटी निधी | १,०३,७२५.०० | |
| ३१,०००.०० | आकस्मिक निधी | ३६,०००.०० | १,१०,७८,८०२.०० |
| | **सभासद ठेवी :** | | |
| १,४९,३४,३७४.०० | बचत ठेव | १,९५,३०,०७४.०० | |
| २,९३,१५,८३५.०० | दैनंदिन बचत ठेव | ४,३०,६९,७६५.०० | |
| ३२,८२,७२३.०० | सभासद ठेव | २९,५०,५७२.०० | |
| १,९४,६७,८००.०० | अल्प मुदत ठेव | १,७६,४८,३६३.०० | |
| १,९२,७५,१४६.०० | मुदत ठेव | २,३०,६५,८७१.०० | |
| १,८५,५१,५६७.०० | दामदुप्पट ठेव | १,६५,४३,८९६.०० | |
| ७५,५३५.०० | पारिजात बक्षीस ठेव -१९९८ | ५७,५१५.०० | |
| ३,१६,००३.०० | पारिजात बक्षीस ठेव -२००० | २,१२,००३.०० | |
| ३१,१४,६८२.०० | सिद्धी ठेव - २००१ | १,१६,०००.०० | |
| ३०,२८,३३४.०० | संकल्प सिद्धी ठेव - २००३ | २८,२३,४१०.०० | |
| १,५६,६४,२७५.०० | मासिक प्राप्ती ठेव | १,५९,२०,९५०.०० | |
| २२,२८,३९५.०० | आवर्त ठेव | १३,६६,८१८.०० | |
| २,१५,३४,८१०.०० | शुभकार्य ठेव | २,७२,७३,८१६.०० | |
| ०.०० | धनवृद्धी ठेव | १,५४,५५,९१०.०० | १८,६०,३४,९६३.०० |
| | **इतर देणी व तरतूद :** | | |
| ८,९४,२८७.०० | ठेवीवरील देय व्याज | ७,५२,३४९.०० | |
| ५,८६,३५१.०० | लाभांश देणे | ६,४२,८७७.०० | |
| १५,०००.०० | रिटेंशन मनी | २७,०००.०० | |
| १७,०८,००,८०९.०० | पुढील पानवर..... | | २०,७७,९८,७६५.०० |

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००६-०७ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २००७-०८ रु. पैसे |
|---|---|---|---|
| | **रोख व बँक शिल्लक :** | | |
| ७,८९,६१५.५१ | रोख शिल्लक | ८,३७,९४७.१० | |
| ९,५०,४०५.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक लि. | ७,८९,१८३.०० | |
| ३३,११७.५० | महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. | २७,००३.३० | |
| १०,५९२.०० | ठाणे जिल्हा मध्य.सह.बँक लि. | १७,९९३.०० | |
| ७३,१६२.७९ | नवी मुंबई को-ऑप.बँक लि. | २,७५,१२२.७९ | |
| २,११,५३०.०० | अभ्युदय को-ऑप.बँक लि. | १,५६,७८२.०२ | |
| १७,८७६.०० | नॅशनल को-ऑप. बँक लि. | २,१५,४३७.५० | |
| ४०,८९४.०० | अजित सहकारी बँक लि. | १०,१५६.०० | |
| ५१,३६१.०० | राजर्षी शाहू सहकारी बँक लि. | ६,३३२.०० | |
| १,३७५.०० | परिवर्तन को-ऑप. बँक लि. | १,३७५.०० | |
| ६९,७२९.३१ | ॲक्सिस बँक लि. | ५८,६६५.५४ | |
| ०.०० | सोपानकाका सहकारी बँक लि. | १४,३५५.०० | |
| ०.०० | सातारा सहकारी बँक लि. | ३,४७३.९८ | |
| ०.०० | महानगर को-ऑप. बँक लि. | २,९५०.०० | २४,१६,७७६.२३ |
| | **गुंतवणूक :** | | |
| १,०००.०० | ठाणे जिल्हा मध्य सहकारी बँक -भाग | १,०००.०० | |
| ३,०००.०० | महा.राज्य सह.पत.फेडरेशन-भाग | ३,०००.०० | |
| ३२,३७,८५०.० | ठाणे जि.म.सह.बँक -राखीव व इतर निधी | ३३,४०,५३०.०० | |
| ८,९५,००.०० | महा.राज्य सह.बँक - राखीव व इ.निधी | १४,६५,०००.०० | |
| ७७,४०,०००.०० | ठाणे जि. मध्य.सह.बँक -मुदत ठेव | ५३,२०,०००.०० | |
| २३,७५,०००.०० | महा.राज्य सहकारी बँक - मुदत ठेव | ५८,००,०००.०० | |
| १,१२,००,०००.०० | कॉसमॉस को-ऑप. बँक -मुदत व आर्वत ठेव | १,१९,००,०००.०० | |
| २०,००,०००.०० | सारस्वत को-ऑप. बँक -मुदत ठेव | २०,००,०००.०० | |
| १८,००,०००.०० | अभ्युदय को-ऑप.बँक -मुदत व आर्वत ठेव | २७,००,०००.०० | |
| १८,००,०००.०० | नवी मुंबई को-ऑप.बँक -मुदत ठेव | २१,७२,४९८.०० | |
| १०,००,०००.०० | यु.टी.आय.म्युचअल फंड | २५,००,०००.०० | |
| ०.०० | द.म.कंळबे जावली सह.बँक लि.-मुदत ठेव | ५,००,०००.०० | |
| ५,००,०००.०० | नॅशनल को-ऑप. बँक - मुदत ठेव | ०.०० | |
| ७,००,०००.०० | अजित सहकारी बँक लि.- मुदत ठेव | ०.०० | ३,७७,०२,०२८.०० |
| | **सभासद कर्जे :** | | |
| २,८५,६३,२१९.०० | वैयक्तिक जामिनकी कर्ज | ३,२५,८८,९६४.०० | |
| ६२,४३,४०८.०० | व्यवसाय कर्ज | १९,२०,६२८.०० | |
| ५३,८७,४९८.०० | वाहन तारण कर्ज | ४७,९६,३०१.०० | |
| ४,९२,३२,३०४.०० | सुरक्षित तारण कर्ज | ७,८२,२५,४५४.०० | |
| १,०६,६०,०२०.०० | इतर तारण कर्ज | ९३,९५,७६६.०० | |
| १३,५५,८८,०३७.११ | पुढील पानवर..... | | ४,०१,१८,८०४.२३ |

दि. ३१ मार्च २००८

| सन २००६-०७ रु. पैसे | भांडवल व देणी | | सन २००७-०८ रु. पैसे |
|---|---|---|---|
| १७,०८,००,८०९.०० | मागील पानावरुन....... | | २०,७७,९८,७६५.०० |
| २८,१२१.०० | अधिभार (सरचार्ज) देणे | ९,११९.०० | |
| १२,८००.०० | शेअर्स अनामत खाते | ११,९००.०० | |
| ३,५४५.०० | व्यवसाय कर | ५,२१०.०० | |
| १७,३५८.०० | आयकर टी.डी. एस. | ३२,८०२.०० | |
| २२,६७०.०० | सेवक भविष्य निर्वाह निधी | ३३,३११.०० | |
| १,४६,२४३.०० | लेखापरिक्षण फी | १,६०,०००.०० | |
| ५,०००.०० | शिक्षण निधी | ५,०००.०० | |
| ६,०१०.०० | कर्मचारी विमा हप्ता | ५,१७०.०० | |
| १०,०००.०० | अतिरिक्त लाभ कर | २०,०००.०० | |
| १३,३००.०० | टेलिफोन बिल | १२,९००.०० | |
| १७,६००.०० | विज बिल | २०,६००.०० | |
| ३२,७००.०० | व्यवसायिक फी व इतर खर्च | ०.०० | १७,३८,३९८.०० |
| १०,५७,५००.०० | थकीत व्याज निधी तरतूद : | | ९,९६,०००.०० |
| | नफा तोटा खाते : | | |
| ४४०.२४ | मागील वर्षाचा शिल्लक नफा | ४०६.११ | |
| १०,९२,६६७.८७ | अधिक : चालू वर्षाचा नफा | १२,१९,२८६.८१ | १२,१९,६९२.९२ |
| १७,३२,६६,७६४.११ | एकूण | | २१,१७,५२,८५५.९२ |

दिनांक : १९/७/०८
ठिकाण : वाशी, नवी मुंबई

बी. आर. सावंत ॲन्ड कं.
चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत हिशोब तपासणीस

श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

## रोजीचे ताळेबंदपत्रक

| सन २००६-०७ रु. पैसे | मालमत्ता व येणी | | सन २००७-०८ रु. पैसे |
|---|---|---|---|
| १३,५५,८८,०३७.११ | मागील पानावरुन........ | | ४,०१,१८,८०४.२३ |
| १०,२२,८४८.०० | शासकिय रोखे कर्ज | १३,७६,७२१.०० | |
| ६,४६,०८४.०० | दावा दाखल कर्ज | १२,४५,५०१.०० | |
| ४,४१,०८१.०० | कर्मचारी वैयक्तिक कर्ज | १०,७९,६०१.०० | |
| १,६७,४१६.०० | कर्मचारी वाहन कर्ज | २,३८,८९६.०० | |
| ३,३४,६७७.०० | कर्मचारी घरतारण कर्ज | ३,०६,५८७.०० | |
| ५,४५,८७४.०० | दैनंदिन ठेव प्रतिनिधी कर्ज | १०,४०,४५०.०० | |
| १,४१,३२,८८९.०० | ठेव तारण कर्ज | १,७५,९१,१७४.०० | |
| ८,२२,९६३.०० | सोने तारण कर्ज | १४,५६,०८६.०० | १५,१२,६२,१२९.०० |
| | **मालमत्ता :** | | |
| २७,५९,३३४.०० | फर्निचर व फिक्चर्स खाते | ३०,६५,३७७.०० | |
| ९,५३,४६९.०० | संगणक खाते | ११,२१,३५७.०० | |
| २,२१,१२०.०० | वातानुकूलीत यंत्रे खाते | २,५२,००३.०० | |
| ६४,६३२.०० | इलेक्ट्रीक साधन सामुग्री खाते | ९१,९११.०० | |
| १,४३,२०४.०० | कार्यालय साधन सामुग्री खाते | २,०५,५२३.०० | |
| ०.०० | इनव्हर्टर खाते | ३५,५५०.०० | |
| ७८,०४,८५०.०० | इमारत खाते | ७७,५१,१६०.०० | |
| २७,७४६.०० | डेली कलेक्शन मशिन खाते | १९,४२२.०० | |
| १,७६९.०० | ग्रंथालय खाते | १,५९२.०० | १,२५,४३,८९५.०० |
| | **येणे व्याज :** | | |
| १०,५७,४६७.०० | सभासद कर्जावरील येणे व्याज | ९,९५,२११.०० | |
| ५५,४७,०१३.०० | गुंतवणूकीवरील येणे व्याज | ५६,६१,८७८.०० | ६६,५७,०८९.०० |
| | **इतर येणी :** | | |
| ४,५०,०००.०० | कार्यालय अनामत | ५,६०,०००.०० | |
| ८,८००.०० | एम.टी.एन.एल.अनामत | १०,०५०.०० | |
| २४,२१०.०० | एम.एस. ई.बी. अनामत | २४,२१०.०० | |
| ५,०००.०० | बि.ई.एस.टी. अनामत | ५,०००.०० | |
| २,६५,६९५.०० | स्टेशनरी स्टॉक | २,३६,६१४.०० | |
| ११,११०.०० | मुद्रांक साठा | ८,८००.०० | |
| २७,८६१.०० | आगाऊ विमा | ३०,७००.०० | |
| १,३८७.०० | टी.डी.एस.येणे खाते | ३,२९३.०० | |
| १,१७,७२३.०० | प्राथमिक खर्च (शाखा उद्घाटन) | १,७९,९६६.०० | |
| ०.०० | वेस्टर्न युनियन मनी ट्रान्सफर येणे | ९०,६०५.६९ | ११,४९,२३८.६९ |
| | **ॲडव्हान्स :** | | |
| ७२,४२५.०० | दै.ठेव प्रतिनिधी मशीन ॲडव्हान्स | | २१,७००.०० |
| १७,३२,६६,७६४.११ | एकूण | | २१,१७,५२,८५५.९२ |

| श्री. कृष्णा पां. धुमाळ | श्री. बाळासाहेब वि. ताकवले | श्री. कैलास वि. खोपडे |
|---|---|---|
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

दि. ३१ मार्च २००८

| सन २००६-०७ रु. पैसे | खर्च | सन २००७-०८ रु. पैसे |
|---|---|---|
| ८८,३३,६८३.०० | सभासद ठेवीवरील व्याज | १,२९,५६,७४४.०० |
| १८,२४,४९६.०० | कर्मचारी पगार, बोनस व भत्ता | २४,६०,६९१.०० |
| १,५२,८३४.०० | कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संस्था अंशदान | १,८०,९०२.०० |
| ४१,५००.०० | कर्मचारी सेवा उपदान निधी | ३५,०००.०० |
| २७,२५,९६०.०० | दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ३२,८८,७८२.०० |
| ४,२५,५००.०० | कार्यालय भाडे | ६,०४,५००.०० |
| २,०१,१३९.५० | छपाई व स्टेशनरी खर्च | २,२७,२६७.५० |
| ५२,०००.०० | वार्षिक अहवाल खर्च | ४२,६४०.०० |
| १,१५,६८३.०० | किरकोळ खर्च | १,३८,९६२.०० |
| २,०९,५४३.०० | विज खर्च | २,७०,८३६.०० |
| १,०९,८४९.०० | टेलिफोन खर्च | १,२७,८६४.०० |
| ६६,८९८.०० | प्रवास खर्च | १,००,९३६.०० |
| ३२,९९३.०० | विमा खर्च | ४६,३९५.०० |
| ८,३६३.०० | तार व टपाल खर्च | ३८,१६९.०० |
| २१,०७२.०० | कार्यालय दुरुस्ती व देखभाल खर्च | २७,२११.०० |
| ५,१३२.०० | कार्यालय पाणी बिल खर्च | ३,०९६.०० |
| ०.०० | दिनदर्शिका छपाई खर्च | १,३७,५००.०० |
| ४,८८९.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल खर्च | १,१५०.०० |
| १,१८,९८८.०० | संगणक दुरुस्ती व देखभाल (A.M.C.) | १,४७,६०७.०० |
| २,६००.०० | वातानुकूलीत यंत्रे (A.M.C.) | ०.०० |
| ६,०००.०० | कार्यालय साफसफाई (A.M.C.) | १३,२००.०० |
| १६,९०२.०० | डेली कलेक्शन मशिन (A.M.C.) | १०,८९९.०० |
| ९,८२२.०० | कार्यालय मालमत्ता कर खर्च | ९,८२२.०० |
| ४,६५९.०० | कार्यालय देखभाल शुल्क | ४,७३५.०० |
| ४२,१०५.०० | कार्यालय साफसफाई खर्च | ४९,८११.०० |
| १,४५,०००.०० | लेखापरिक्षण फी (शासकीय/ अंतर्गत) | १,६२,७८४.०० |
| ४०,४३०.०० | कायदे सल्लागार फी | १०,९७०.०० |
| २,५००.०० | व्यवसाय कर खर्च (संस्था) | २,५००.०० |
| १,१००.०० | सभासदत्व व वर्गणी | २,१००.०० |
| ०.०० | दिपावली भेट खर्च | १७,६००.०० |
| २६,६३४.०० | पुजा खर्च | ५९,९३४.०० |
| १६,०१२.८० | बॅंक चार्जेस खर्च | २९,१९६.४७ |
| १,५२,६३,५८७.३० | पुढील पानवर..... | २,१२,०९,८०३.९७ |

## रोजीचे नफा-तोटा पत्रक

| सन २००६-०७ रु. पैसे | उत्पन्न | सन २००७-०८ रु. पैसे |
|---|---|---|
| २६,४७,२७६.०० | गुंतवणुकीवरील व्याज | २८,१२,४९१.०० |
| १,४२,८१,९५०.०० | सभासद कर्जावरील व्याज | २,१०,२२,६८६.०० |
| ७६,१५२.०० | कर्ज प्रोसेसिंग चार्जेस जमा | ४,२६,०९०.०० |
| ७५,५०२.०० | कर्ज वसुली चार्जेस जमा | २,२५,७१०.०० |
| २,७०,९५४.७२ | फॉर्म फी, सर्विस चार्जेस इ. | १,६४,६७६.७८ |
| १५०.०० | लाभांश | १५०.०० |
| १,७३,५१,९८४.७२ | पुढील पानवर..... | २,४६,५१,८०३.७८ |

दि. ३१ मार्च २००८

| सन २००६-०७ रु. पैसे | खर्च | सन २००७-०८ रु. पैसे |
|---|---|---|
| १,५२,६३,५८७.३० | मागील पानावरुन....... | २,१२,०९,८०३.९७ |
| १,१६,३३५.५५ | अधिकर्ष खाते व्याज | ५,०३,८४९.०० |
| ३१,४४०.०० | सर्विस टॅक्स | ४२,३५१.०० |
| ९,८५६.०० | कर व परवाना फी | २,८५०.०० |
| १८,३१२.०० | अतिरिक्त लाभ कर | ३२,००७.०० |
| १९,५५४.०० | वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च | २४,८०३.०० |
| ८०,८७०.०० | प्राथमिक खर्च निर्लेखित | ५७,२७८.०० |
| ३४,२००.०० | संचालक सभा भत्ता खर्च | ५४,६५०.०० |
| ०.०० | सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट चार्जेस | ३,०००.०० |
| ७,५४२.०० | फेस्टिवल सेलिब्रेशन खर्च | ८,८१४.०० |
| २४,८४९.०० | भेट व तपासणी खर्च | ४४,१६५.०० |
| १,०००.०० | लॉकर भाडे | १,०००.०० |
| ०.०० | कर्ज वसुली खर्च | १,३६,३३७.०० |
| ०.०० | जाहिरात खर्च | ३५,३५१.०० |
| ६६,०००.०० | थकित व्याज निधी तरतूद | ०.०० |
| ५,०००.०० | शिक्षण निधी तरतूद | ५,०००.०० |
| ०.०० | संशयित व बुडित कर्ज तरतूद | ३,४२,०००.०० |
| ५,८०,७७१.०० | घसारा | ९,२९,२५८.०० |
| १०,९२,६६७.८७ | निव्वळ नफा ताळेबंद वर्ग | १२,११,२८६.८१ |
| १,७३,५१,९८४.७२ | एकूण | २,४६,५१,८०३.७८ |

दिनांक : १९/७/०८
ठिकाण : वाशी, नवी मुंबई

बी. आर. सावंत अॅन्ड कं.
चार्टर्ड अकौटंट -अंतर्गत हिशोब तपासणीस

श्री. विजय बं. मोरे
मुख्य कार्यकारी अधिकारी

## रोजीचे नफा-तोटा पत्रक

| सन २००६-०७ रु. पैसे | उत्पन्न | सन २००७-०८ रु. पैसे |
|---|---|---|
| १,७३,५१,९८४.७२ | मागील पानावरुन........ | २,४६,५१,८०३.७८ |
| १,७३,५१,९८४.७२ | एकूण | २,४६,५१,८०३.७८ |

श्री. कृष्णा पां. धुमाळ
खजिनदार

श्री. बाळासाहेब वि. ताकवले
सचिव

श्री. कैलास वि. खोपडे
अध्यक्ष

## वैधानिक लेखापरीक्षकाचा अहवाल : (सन २००६-०७)

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५-ब) आणि महाराष्ट्र सहाकारी संस्थाचा नियम ६९ अन्वये द्यावयाचा)

### पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

या संस्थेचे दि. ३१.०३.२००७ रोजीचे ताळेबंद पत्रक आणि त्या दिवशी संपणाऱ्या वर्षाचे नफा-तोटा पत्रक लेखापरीक्षण करुन सोबत जोडलेली आहेत. हि हिशोबी पत्रके तयार करण्याची जबाबदारी संस्थेच्या व्यवस्थापनाची आहे. या आर्थिक पत्रकाचे लेखापरीक्षण करुन त्यावर मत प्रदर्शित करण्याची आमची जबाबदारी आहे.

साधारणतः भारतामध्ये स्विकृत झालेल्या लेखापरीक्षण मान्यकांनुसार आम्ही संस्थेचे लेखापरीक्षण केलेले आहे. या लेखापरीक्षण मान्यकांनुसार आम्ही लेखापरीक्षण कार्यक्रम आखुन व त्याप्रमाणे काम करुन विश्वासपुर्वक असे पाहिले आहे की, सदर आर्थिक पत्रकांत कोणतेही महत्वाचे दोष राहु नयेत. लेखापरीक्षणात चाचणी तपासणी तसेच आर्थिक पत्रकांतील रक्कमांच्या संदर्भात कागदपत्रे तपासून या रकमा पत्रकांत योग्यरीत्या दाखविलेल्या असल्या बद्दलची खात्री करणे त्याच प्रमाणे मान्यता प्राप्त लेखांकन सिद्धांताप्रमाणे आर्थिक पत्रकांचे मुल्यांकन लेखापरीक्षणात समाविष्ट आहे. त्यामुळे आम्ही केलेल्या लेखापरीक्षणाप्रमाणे प्रस्तुत वाजवीरीत्या मत प्रदिर्शित करण्याबद्दल आम्हांला खात्री आहे.

त्याप्रमाणे मी आभिप्राय देतो की,

१. आमच्या लेखापरीक्षणाच्या संदर्भात, आमच्या ज्ञानाप्रमाणे आणि विश्वासाप्रमाणे, आम्ही संस्थेकडून मागितलेली सर्व माहिती व स्पष्टीकरणे आम्हाला समाधाणकारक वाटली.

२. संस्थेचे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके हि महाराष्ट्र सहकारी सोसायटयांचा कायदा व त्या खालील नियमानुसार तयार केलेली आहेत.

३. संस्थेचे ताळेबंद आणि नफा-तोटा पत्रके हि संस्थेच्या हिशोबी व विवरणे या बरोबर मिळती जुळती आहेत.

४. माझ्या मते मला दिलेल्या माहीती व स्पष्टिकरणानुसार त्याचप्रमाणे या आर्थिक पत्रकावर दिलेल्या स्वतंत्र टिपणानुसार आणि अलहिदा दिलेल्या शेऱ्यास पात्र राहून तसेच भारतामध्ये साधारण : स्विकृत असलेल्या लेखापरीक्षण मान्यकांनुसार :

अ) ताळेबंद पत्रक सोसायटीची दि. ३१ मार्च २००७ ची खरी व योग्य स्थिती दाखविते,

ब) नफा-तोटा पत्रक दि.३१ मार्च २००७, रोजी संपलेल्या वर्षाचा खरा व योग्य नफा दर्शविते.

५. सन २००६-२००७ या सहकारी वर्षासाठी लेखापरीक्षण वर्ग **'अ'** देण्यात आला आहे.

६. वरील दाखला प्रसारित करण्यात येणाऱ्या लेखापरीक्षण प्रतिव्रत्तातील भाग **अ, ब,** व **क** मधील शेऱ्यास पात्र राहून देण्यात येत आहे.

**मे. मोझ्झारीया ॲण्ड असोसिएटस**

सनदी लेखापाल

स्थळ : नवी मुंबई

दिनांक : १२/१२/२००७

सही

**नयन मोझ्झारीया**

प्रोप्रायटर

## अंतर्गत हिशोब तपासणीसांचा अहवाल :

### पारिजात को-ऑप.क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

आम्ही पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई या संस्थेचे सोबत जोडलेले ०१/०४/२००७ ते ३१/३/२००८ अखेरचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक तपासले असून अहवाल सादर करतो की,

१) आम्हांला लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपुर्ण ज्ञानाप्रमाणे /माहिती प्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध आहेत.

२) आमच्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या १९६० या कायदा व त्या खालील नियम व संस्थेच्या पोटनियमानुसार आवश्यक असलेली योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवल्याचे आमच्या तपासणीत आढळून आले.

३) आम्ही तपासलेले सोबतचे ताळेबंद व नफा तोटा पत्रक ही संस्थेने हिशोबाच्या पुस्तका नुसार तयार केली आहे.

४) आमच्या मते आणि आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे संस्थेने सदर हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्था १९६० च्या कायद्यानुसार,

अ. ३१ मार्च २००८ अखेरचा ताळेबंद संस्थेची खरी व योग्य स्थिती दर्शवित आहे.

ब. त्याच दिवशी संपणाऱ्या काळातील नफा-तोटा पत्रक संस्थेला झालेल्या निव्वळ नफ्याबाबत खरी व योग्य स्थिती दर्शविते.

५) संस्थचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थेच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या आर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितात.

सही

स्थळ : वाशी, नवी मुंबई

दिनांक : १९/७/२००८

**बी. आर. सावंत ॲण्ड कं.**
चार्टर्ड अकौटंट
अंतर्गत हिशोब तपासणीस

## अंदाज पत्रक सन २००८-२००९

(रु.लाखात)

| उत्पन्न | अंदाजे उत्पन्न २००७-२००८ | प्रत्यक्ष उत्पन्न २००७-२००८ | अंदाजे उत्पन्न २००८-२००९ |
|---|---|---|---|
| कर्जावरील व्याज | १९०.६६ | २१२.४८ | २९९.४७ |
| गुंतवणुकीवरील व्याज | ३४.०० | २८.१२ | ३०.९३ |
| इतर उत्पन्न | ५.०० | ५.९१ | ७.९० |
| एकूण रु. | २२९.६६ | २४६.५१ | ३३८.३० |

| खर्च तपशील | अंदाजे खर्च २००७-२००८ | प्रत्यक्ष खर्च २००७-२००८ | अंदाजे खर्च २००८-२००९ |
|---|---|---|---|
| सभासद ठेवीवरील व्याज | ११८.५० | १२९.५७ | १८५.४६ |
| कर्मचारी पगार, बोनस,भ.निर्वाह निधी व ग्रज्युईटी खर्च | ३०.०० | २६.७७ | ३२.१२ |
| दैंनदिन ठेव प्रतिनिधी कमिशन | ३१.५० | ३२.८९ | ३७.८२ |
| छपाई व स्टेशनरी, अहवाल व कॅलेंडर छपाई खर्च | ३.५० | ४.०७ | ५.०८ |
| वार्षिक सभा व संचालक भत्ता खर्च | ०.९५ | ०.७९ | ०.९८ |
| प्रवास, किरकोळ, दिवाळी भेट, गणवेश, व्हिजीट खर्च | ३.०० | ३.०२ | ५.३८ |
| विमा व पोस्टेज खर्च | ०.५२ | ०.८५ | १.२७ |
| विज,फोन,पाणी,कर,कार्यालय भाडे, सर्विस टॅक्स, लायसन्स फी व अतिरिक्त लाभ कर इ. | १०.१५ | १०.९२ | १३.६५ |
| देखभाल व दुरुस्ती,उद्घाटन,पुजा,फेस्टीव्हल, कार्यालय सर्विस चार्ज व साफसफाई खर्च | २.५० | २.०८ | ४.५० |
| ऑडीट फी खर्च | १.७५ | १.६३ | १.९० |
| AMC वर्गणी, व्यवसाय कर कायदेशीर सल्लागार फी | २.२५ | १.९१ | २.५० |
| ओव्हर ड्राप्ट कर्ज व्याज, बँक चार्जेस व लॉकर भाडे | १.७५ | ५.३४ | ७.०० |
| घसारा खर्च | १०.०० | ९.२९ | १६.५० |
| तरतूदी (शिक्षण निधी व बुडीत कर्ज निधी) | १.०० | ३.४७ | ५.०० |
| कर्ज वसुली व जाहिरात खर्च | | १.७२ | ३.०० |
| नफा | १२.२९ | १२.१९ | १६.१४ |
| एकूण रु. | २२९.६६ | २४६.५१ | ३३८.३० |

## संचालक कर्जाचा तपशिल :

| ३१-०३-२००८ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००८ अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| २८,८०,७००.०० | ०.०० | ०.०० |

## संचालक नातेवाईक कर्जाचा तपशिल :

| ३१-०३-२००८ अखेर येणे कर्ज | ३१-०३-२००८ अखेर थकबाकी | थकबाकीचे प्रमाण |
|---|---|---|
| १६,६२, ३११.०० | ०.०० | ०.०० |

## पोटनियम दुरुस्ती

| पो.नि. क्र. | अस्तित्वातील शब्दरचना | दुरुस्तीनंतर शब्दरचना | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| अ.१. १. | संस्थेचे नांव आणि पत्ता :- संस्थेचे नांव : पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., असे राहील आणि पत्ता : ए/३/७,मराठा भवन मार्ग, सेक्टर १५, वाशी, नवी मुंबई असा राहील. | संस्थेचे नाव आणि पत्ता :- संस्थेचे नांव : पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., असे राहील आणि पत्ता : पारिजात भवन, प्लॉट नं. १८, सेक्टर १०अे, नेरुळ (प) नवी मुंबई - ४००७०६. | मुख्यालयासाठी नवीन जागा खरेदी केल्याने. |
| अ.१. १. अ | संस्थेचे कार्यक्षेत्र :- संस्थेचे कार्यक्षेत्र ठाणे, बृहन्मुंबई,रायगड व पुणे जिल्हा पुरते मर्यादित राहील. | संस्थेचे कार्यक्षेत्र :- संस्थेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादित राहील. | बरेचसे सभासद व्यवसाया निमित्त महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यात स्थायीक झाल्याने. तसेच ग्रामीण भागातील सभासदांना बचतीस प्रोत्साहन देणे तसेच गरजुंना कर्ज वितरण करणे व कर्ज वसुल करणेसाठी. |

## संस्थेची गत पाच वर्षातील आर्थिक प्रगती

| सन | २००३-२००४ | २००४-२००५ | २००५-२००६ | २००६-२००७ | २००७-२००८ |
|---|---|---|---|---|---|
| भाग भांडवल | ७७,०३,८०० | ७८,४६,००० | ८३,३८,५०० | ९५,३५,७०० | १,०६,८५,००० |
| गुंतवणूक | १,९२,१३,९४८ | २,००,९८,८५० | ३,०२,९८,८५० | ३,३२,५१,८५० | ३,७७,०२,०२८ |
| ठेवी | ७,२४,१८,७८४ | ८,७५,६७,६२८ | ११,०२,३८,३६९ | १५,०७,८९,४७९ | १८,६०,३४,९६३ |
| कर्जे | ५,६४,१७,५११ | ६,९५,०५,४२१ | ८,०४,५४,७५५ | ११,८२,००,२८१ | १५,१२,६२,१२९ |
| खेळते भांडवल | ८,७७,१७,८५३ | १०,४९,१०,२८३ | १२,९६,१२,२१४ | १७,३२,६६,७६४ | २१,१७,५२,८५५ |



# पारिजात

## को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई

## विद्यार्थी गुण गौरव सोहळा

**सभासदांच्या हुशार मुलांचा गुणगौरव वार्षिक सर्व साधारण सभेत केला जाणार आहे. सभासदांना विनंती करण्यात येते की, त्यांनी २००७-०८ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १०वी आणि १२ वी परीक्षेत कमीत कमी ७०% गुण असलेल्या मुलांचे अर्ज दिनांक ४/८/२००८ पर्यंत संस्थेच्या कार्यालयात त्वरीत पाठवावे. अधिक माहितीसाठी कार्यालयात संपर्क साधावा.**

### सभासदांना सूचना :

- ❖ सभासदाने आपला पत्ता बदलल्यास नवीन पत्याविषयी कार्यालयास लेखी सुचना त्वरीत करावी.
- ❖ ज्या सभासदांनी आपले वारस नेमले नसतील त्यांनी आपले वारस नेमून घ्यावेत.
- ❖ सर्व सभासदांचे लाभांश व भाग दाखले तयार आहेत ते संबंधीत शाखेतून घेऊन जावेत.
- ❖ कर्ज मागणी करताना सभेपूर्वी ३ दिवस अगोदर कर्ज मागणी अर्ज शाखेत जमा करावेत.
- ❖ पूर्ण भरलेले व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केलेले अर्ज कर्ज मंजूर सभेत ठेवले जातील.
- ❖ आपण घेतलेल्या कर्जाचे हप्ते वेळेवर भरा व संस्थेस सहकार्य करा.
- ❖ प्रत्येक महिन्याच्या शेवटी आपले कर्ज, दैनंदिन ठेव, आर. डी. याबाबतचे पासबुकावर संस्थेत येऊन अधिकाऱ्यांची सही घ्यावी,
- ❖ संस्थेच्या व सभासदांच्या हिताच्या दृष्टीने आपला सल्ला व मार्गदर्शन लेखी स्वरुपात कळवा.

# परिशिष्ट - 'अ'

| | | |
|---|---|---|
| संस्थेचे नांव | : | पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई - ४०० ७०३. |
| मुख्य कार्यालय | : | अे/३/७, मराठा भवन मार्ग, सेक्टर -१५, वाशी, नवी मुंबई- ४०० ७०३. |
| नोंदणी क्रमांक | : | टी.एन.ए./टी.एन.ए./आर.एस.आर. (सी.आर) ९५१-९७ |
| कार्यक्षेत्र | : | बृहन्मुंबई, ठाणे, रायगड व पुणे जिल्हा |
| शाखा | : | नऊ (मुख्य कार्यालय व्यतिरिक्त नऊ शाखा) |
| सभासद संख्या | : | ४९०१ |
| अधिकृत भाग भांडवल | : | रु. ५,००,००,०००.०० |
| वसुल भाग भांडवल | : | रु. १,०६,८५,०००.०० |
| राखीव व इतर निधी | : | रु. १,१०,७८,८०२.०० |
| ठेवी | : | रु. १८,६०,३४,९६३.०० |
| कर्जे | : | रु. १५, १२, ६२, १२९.०० |
| बाहेरील कर्जे | : | नाही |
| गुंतवणूक | : | रु. ३,७७, ०२,०२८.०० |
| लेखापरिक्षण वर्ग | : | "अ" (सन २००६-०७) |
| अहवाल सालातील नफा | : | रु. १२,१९, २८६.८१ |
| कर्मचारी वर्ग | : | ३४ |
| खेळते भांडवल | : | रु. २१, १७, ५२, ८५५.९२ |

## विविध ठेव योजना :-

### 'नातवा' पासून 'आजोबा' पर्यंत.... कुटुंबातील सर्वांसाठी

#### मासिक प्राप्ती योजना

खास पेन्शनर व VRS घेतलेल्यांसाठी
रु. १,१४,३५०/-गुंतवा व दरमहा
रु. १०००/- पेन्शन रुपी व्याज मिळवा.

#### शुभकार्य ठेव योजना

| दरमहा | भरा | मिळवा |
|---|---|---|
| रु. ६००/- | फक्त ६६ महिने | रु. ५०,०००/- |
| रु. १२००/- | | रु. १,००,०००/- |

#### व्याजदर (दि. १/०४/२००८)

| | |
|---|---|
| ४६ ते १८० दिवस | ८.००% |
| १८१ ते १२ महिने | ९.०० % |
| १३ महिने ते २४ महिने | १०.५० % |
| २५ महिने व अधिक | १०.०० % |

#### लखपती मुदत ठेव योजना

| | | |
|---|---|---|
| रु. ६२,१००/- | ५ वर्षात | रु.१ लाख |
| रु. ५८,२५०/- | ६८ महिन्यात | रु. १ लाख |

#### दामदुप्पट ठेव योजना

डबल धमाका

आपली रक्कम
८४ महिन्यात
दामदुप्पट

पारिजात चा सुगंध सदैव मोहक असतो पारिजात मधील ठेव सदैव सुरक्षित असते.

## विविध कर्ज योजना :-

### स्वप्न तुमचे ... सहाय्य आमचे

❋ गृहपयोगी उपकरणे ❋ फर्निचर ❋ संगणक ❋ शिक्षण ❋ वाहन ❋ मशिनरी
❋ घरदुरुस्ती ❋ लग्नकार्य ❋ वैद्यकीय ❋ धार्मिक कार्य ❋ व्यवसाय वृद्धी

### विविध कर्ज योजना

**वैयक्तीक कर्ज**
रु. ७५,०००/-
व्याजदर १६%

**वाहन तारण कर्ज**
रु. ७.५० लाख
व्याजदर १५%

**तारण कर्ज**
रु. १०.०० लाख पर्यंत
व्याजदर १५%

**तत्काळ कर्ज**
ठेव तारण
LIC / NSC
सोने तारण



न्यु पनवेल शाखेचे उदघाटन करताना मा. श्री. रामशेठ ठाकुर (मा.खासदार) सोबत मा.श्री.प्रशांतदादा ठाकुर (नगराध्यक्ष, पनवेल) सोबत अन्य मान्यवरांसह संस्थेचे पदाधिकारी.

चंदननगर (पुणे) शाखेचे उदघाटन करताना मा.सौ.राजलक्ष्मी भोसले (महापौर, पुणे) सोबत मा.श्री.बापुसाहेब पठारे (अध्यक्ष, स्थायी समिती पुणे) व अन्य मान्यवर.





पनवेल शहराचे नगराध्यक्ष मा.श्री.प्रशांतदादा ठाकुर यांचा विशेष सत्कार करताना संस्थेचे उपाध्यक्ष श्री.दशरथ बडदे.

चंदननगर शाखा उदघाटन सोहळ्यात आपले मनोगत व्यक्त करताना महापौर मा.सौ.राजलक्ष्मी भोसले






कोपरखैरणे शाखा वर्धापनदिनानिमीत्त माथाडी हॉस्पीटल मधील रुग्णांना फळ वाटप करण्यात आले या प्रसंगी डॉ.हनुमंत पाटील, डॉ.नाईक व संस्थेचे अध्यक्ष श्री. कैलास खोपडे.

# आपल्या सेवेत कार्यरत आमच्या शाखा

## मुंबई विभाग

| | |
|---|---|
| **वाशी** | अे-३/७, सेक्टर १५, मराठा भवन मार्ग, वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३. फोन : २७८०२६५९ |
| **नेरुळ** | साईप्रसाद शॉपिंग कॉम्प्लेक्स, शॉप नं. २८, प्लॉट नं. १७, सेक्टर ८, नेरुळ, नवी मुंबई - ४०० ७०६. फोन : ३२५९६९८५ |
| **दादर** | १०९, 'बी' विंग, गुरुकृपा हौ. सोसायटी, न. चि. केळकर रोड, प्लाझा सिनेमा समोर, दादर (प.), मुंबई - ४०० ०२८. फोन : २४३०३७३४ |
| **कोपरखैरणे** | शॉप नं. २, प्लॉट नं. १९, स्वागत अपार्टमेंट, सेक्टर ३, कोपरखैरणे, नवी मुंबई - ४०० ७०९. फोन : ३२४८६८०६ |
| **न्यु पनवेल** | अश्वमेघ, शॉप नं.१७, प्लॉट नं. १८, सेक्टर ८, सातारा सह. बँकेसमोर, खांदा कॉलनी, न्यु पनवेल - ४१० २०६. फोन : ३२६७४६५८ |

## पुणे विभाग

| | |
|---|---|
| **धनकवडी** | सरस्वती मंगल कार्यालय, पहिला मजला, सर्व्हे नं. २९/१, पुणे-सातारा रोड, धनकवडी, पुणे - ४०० ०४३. फोन : ०२०-३२९०६७४६ |
| **हडपसर** | अमर समृद्धी कॉम्प्लेक्स, आकाशवाणी केंद्राजवळ, सोलापुर रोड, हडपसर, पुणे - ४०० ०२८. फोन : ०२०-३२५१७६७१ |
| **सिंहगड रोड** | सर्व्हे नं. १९/१७, आनंद नगर, सोमनाथ दुग्धालया जवळ, सिंहगड रोड, पुणे - ४११ ०५१. फोन : ०२०-३२५३११०२ |
| **चंदननगर** | बेंद्रे बिल्डींग, पहिला मजला, सर्व्हे नं. ४६/१, संघर्ष चौक, खराडी रोड, चंदननगर, पुणे - ४११ ०१४. फोन : ०२०-३२३११७२२ |

प्रेषक :

**पारिजात को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., नवी मुंबई**

अे-३/७, सेक्टर १५, मराठा भवन मार्ग, वाशी,
नवी मुंबई - ४०० ७०३. फोन : २७८०२६५९ / ३२५९६९९०

बुक - पोस्ट

प्रति ,